जा. क्र / 532 /26
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग पुणे वाडीया कॉलेज समोर
४५-२, कै. बाळकृष्ण सखाराम ढोले
पाटील मार्ग, पुणे - १
दि. - 17/9/26

प्रति,

मा.धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य मुंबई.

**विषय** :- बाह्ययंत्रणेद्वारे सफाईगार या पदाच्या निविदा सुचना संकेतस्थळावर प्रसिदध करणेबाबत.

**संदर्भ** :- दि.१६/०९/२०२६ रोजीची निविदा सुचना.

मा.महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, धर्मादाय आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग पुणे या कार्यालयाची बाह्ययंत्रणेद्वारे सफाईगार या पदाची निविदा सुचना संकेतस्थळ प्रसिदध करणेसाठी सविनय सादर.

आपला विश्वासू,

(दिनेश ए.कोठलीकर)
धर्मादाय सह आयुक्त,
पुणे विभाग, पुणे.

सोबत :-

१) सफाईगार निविदा सुचना.

जा. क्र / 53.18/26
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग पुणे वाडीया कॉलेज समो.
४५-२, कै. बाळकृष्णा सखाराम ढोले
पाटील मार्ग, पुणे - १
दि. - 17/9/26

# निविदा सुचना

या द्वारे, सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येते की, धर्मादाय सह आयुक्त पुणे ,विभाग पुणे या कार्यालयात **सफ़ाईगार** या पदासाठी निवीदा प्रक्रीया पार पाडणेकामी बाह्ययंत्रणेद्वारे निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहे. खालील अटी व शर्ती नुसार त्यामान्य असल्यास निविदा दि. **२८/०९/२०२६** रोजी दुपारी **४.००** वाजे पर्यंत सादर कराव्या.त्यानंतर प्राप्त होण्या-या निविदांचा विचार केला जाणार नाही.

## साफ़सफ़ाई कामाचे स्वरुप आणि अटी व शर्ती

१. धर्मादाय सह आयुक्त, पुणे हे कार्यालय ४५-२, वाडिया कॉलेज जवळ,कै.बाळकृष्ण सखाराम ढोले पाटील मार्ग,पुणे येथे आहे. धर्मादाय सह आयुक्त पुणे येथील( एकूण क्षेत्रफ़ळ सूमारे २२००० चौ.फ़ुट) अशी असून सभोवताली इमारत व कंपाऊंड वॉल यामध्ये मोकळी जागा आहे. तेथील साफ़सफ़ाई बाबतचे काम हे **सन** २०२६ते **सन**२०२७ या १२ महिने कालावधीसाठी आहे.

२. दरपत्रक देणारी संस्था किंवा कंपनी किंवा एकल व्यवसायीक नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

३. ठेकेदाराने करावयाच्या कामाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

   १) कार्यालयातील सर्व शाखा ,जीने व परिसर दररोज कार्यालयीन वेळेपुर्वी म्हणजे सकाळी ९.३० पर्यंत झाडून सफ़ाई करणे.

   २) कार्यालयातील फ़रशा डिटर्जंट/फ़िनाईल मिश्रित पाण्याने दररोज साफ़ करणे.

   ३) कार्यालयातील प्रसाधन गृहे डिटर्जंट व फ़िनाईल वापरुन दिवसातून ३ वेळा म्हणजे सकाळी ९.३० पूर्वी दुपारी १.०० पुर्वी व सायंकाळी ४.०० पूर्वी साफ़ करणे. सर्व प्रसाधनगृहात डांबर गोळ्या टाकणे. दिवसातून तीन वेळा लिक्वीड साबण ठेवणे व चोक-अप काढणे. सदर सफ़ाईकरीता आवश्यक असलेली साहित्य सामग्री कंत्राटदाराने पुरविणे बंधनकारक राहिल.

   ४) कार्यालयातील मांडण्या व कपाटे रोज साफ़ करणे तसेच कार्यालयातील खिडक्या व दरवाजे रोज साफ़ करणे.

   ५) कार्यालयातील खिडक्यांच्या काचा रसायन आणि पाण्याने साफ़ करणे व अधिकारी कक्षाचे दुभाजक आठवड्यातून एकदा पाण्याने साफ़ करणे.

   ६) कार्यालयातील भिंती ,छते व गच्ची आठवड्यातून एकदा साफ़ करणे व कोळीष्टके काढून टाकणे.

   ७) कार्यालयातील फ़र्निचर व अभिलेख्यांवर महिन्यातून दोन वेळा किटक नाशके फ़वारणे.

   ८) कार्यालयातील सर्व दिवे/पंखे महिन्यातून एकदा साफ़ करणे.

   ९) कार्यालयातील खिडक्यांना लावलेले पडदे धुवून स्वछ करुन पुन्हा लावणे.

१०)कार्यालयात आलेले पावसाचे पाणी काढून कार्यालयीन जागा कोरडी करणे, कार्यालयातील कार्यक्रमा अगोदरच्या दिवशी सर्व साफ़सफ़ाई करणे, कार्यक्रम समाप्त होईपर्यंत स्वछता ठेवणे बंधनकारक राहील.

११) ठेकेदाराने आठवड्यातून दोनदा कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवून साफ़सफ़ाईच्या कामा संदर्भातील अडचणींचे निवारण करणे.

१०)साफ़सफ़ाईची निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून आठ दिवसाच्या आत कंत्राटदाराने कार्यालयाबरोबर स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन दिला पाहिजे. कराराची मुळ प्रत या कार्यालयाकडे राखून ठेवण्यात येईल.

११)निविदा मंजुर झाल्यानंतर ठेकेदारास रुपये १५०००/- (रुपये पंधरा हजार फ़क्त) एवढी रक्कम बिनव्याजी सुरक्षा ठेव म्हणून ठेवावी लागेल. कराराची मुळ मुदत, वाढवलेली मुदत संपल्यानंतर ही रक्कम ठेकेदारास त्यांच्याकडून कार्यालयाचे झालेले नुकसान वजा करुन परत करण्यात येईल.

१२)कार्यालयाची /परिसराची स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल

• कोणत्याही प्रकारे अस्वच्छता आढळीन आल्यास व ठरवून दिलेली स्वच्छता न केल्यास प्रत्येक घटनेस कंत्राटदारास रु.५००/- दंड आकारण्यात येईल.

१३)कार्यालयाच्या इमारतीमध्ये व परिसरात असणा-या सर्व वस्तु ह्या कार्यालयाच्या मालकीच्या राहतील व त्या कार्यालयाच्या पुर्वपरवानगीशिवाय कार्यालयाच्या हद्दीबाहेर हलवीता येणार नाहीत.

१४)साफ़सफ़ाईसाठी लागणारा कर्मचारी वर्ग साफ़सफ़ाईच्या कामात पारंगत असावा. नियुक्त केलेल्या साफ़सफ़ाई कर्मचारी यांचे किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा योजना,भविष्य निर्वाह निधी,बोनस, ग्रॅज्युइटी इ. बाबत कायदेशीर बाबींची पुर्तता संबंधीत कंत्राटदार यांनी करावयाची आहे.कंत्राटदाराच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या कराचा भरणा स्वतः कंत्राटदारास करावा लागेल.

१५)नियुक्त केलेला कर्मचारी हा नेहमी स्वच्छ ,निरोगी व विहित केलेल्या गणवेषात व छातीवर ओळखपत्र लावलेले असले पाहिजे अशी दक्षता कंत्राटदारास घ्यावी लागेल नियुक्त केलेल्या कर्मचा-याची यादी आणि त्यांचा पुर्व इतिहास याबाबतची सर्व माहिती कार्यालयास पुरवावी लागेल. नियुक्त कर्मचा-यास कोणताही संसर्गजन्य रोग होणार नाही याची दक्षता संबंधीत कंत्राटदाराने घ्यावी. वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र दर सहा महिन्यांनी कार्यालयास सादर करावे.

१६)साफ़सफ़ाई बाबत व्यवस्थेबाबत आकारण्यात येणारे केंद्र व राज्य सरकार,स्थानिक संस्था यांच्हे कर, परवाने फ़ी इ. कंत्राटदारास भरावी लागेल.

१७)नियुक्त केलेल्या कर्मचा-यांकडून काम करुन घेण्यासाठी पर्यावेक्षक नियुक्त करण्यात यावा.सदर पर्यावेक्षकाचे वेतन कंत्राटदाराने अदा करावे.

१८)साफ़सफ़ाईचे काम करणारा एखादा कर्मचारी कामावर न आल्यास अथवा गैरहजर राहिल्यास त्या जागेवर तात्काळ दुसरा कर्मचारी नियुक्त करण्याची व काम पूर्ण करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

१९) साफ़सफ़ाईच्या देयकातून नियमानुसार आयकर कपात केला जाईल.

२०) साफ़सफ़ाईच्या कामाबाबत कार्यालयातील अधिकारी/अधिक्षक यांच्याकडून काम असमाधानकारक असल्याचे लेखी अभिप्राय प्राप्त झाल्यास त्या महिन्याच्या देयकातून १० टक्के रक्कम दंड म्हणून कपात करण्यात येईल.

२१) साफ़सफ़ाईचे काम करतांना कार्यालयाच्या नियमाचे व करारनाम्यातील अटींचे पालन न केल्यास निविदा रद्द करण्यात येईल व त्यासोबत भरलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२२) उपरोक्त अटी व शर्तीमध्ये परिस्थितीनुसार बदल करण्याचे अधिकार कार्यालयास असतील.

२३) एक किंवा सर्व निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबत सर्व अधिकार कार्यालयाने स्वतःकडे राखून ठेवले आहे.

२४) ठेकेदारास प्रासंगिक करार कामगार (नियंत्रण व निर्मूलन) कायदा १९७० च्या सर्व अटी पाळाव्या लागतील. ठेकेदारास कामगारांची मजुरी शासनाने वेळोवेळि ठरवून दिलेल्या किमान मजुरी/वेतन दरानुसार प्रासंगिक करार कामगारांना घ्यावी लागेल.

२५) ठेकेदारास प्रत्येक दिवशी कार्यालयीन वेळेत साफ़सफ़ाई कामगारांचा हजेरीपट, प्रत्यक्ष सादर करावा लागेल.सोपविलेल्या साफ़सफ़ाईच्या कामात दिरंगाई/गैरवर्तन आढळल्यास व त्याबाबत कार्यालयीन कर्मचारी यांची तक्रार आल्यास ठेकेदारास स्पस्ह्टीकरणाची संधी दिल्यानंतर तक्रार योग्य ठरल्यास प्रत्येक तक्रारीकरीता रु.५००/- (रुपये पाचशे मात्र)इतका दंड आकारण्यात येईल किंवा गैरवर्तनात अश्लिल हावभाव किंवा कार्यालयातील महिला कर्मचा-यांशी गैरवर्तन केल्यास आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.तसेच ठेकेदाराने नेमलेल्या कर्मचा-यांनी दैंनंदीन सरासरी हजेरी न आढळल्यास त्या प्रमाणात साफ़सफ़ाईच्या मासिक देयकातून वसूल करण्यात येईल.

२६) ठेकेदाराने स्वखर्चाने आवश्यक किंमतीच्या मुद्रांक कागदावर करारनामा करुन घ्यावा लागेल. ठेकेदारास बहुमजली इमारतीच्या साफ़सफ़ाई कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव असने आवश्यक आहे. ठेकेदाराने त्या अनुभवांपुष्ट्यर्थ संबंधीत संस्थेचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

२७) ठेकेदाराने त्यांचे कामगारांना त्यांच्या छायाचित्रासह ओळखपत्र द्यावे. ओळखपत्र असलेल्या कामगारांना या कार्यालयात साफ़सफ़ाईच्या कामावर नेमण्यात येणे बंधनकारक आहे.

२८) कामावर असतांना कंत्राटदाराच्या कामगारास कोणतीही इजा/जखम झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.धर्मादाय सह आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय पुणे यांची कोणतीही जबाबदारी असणार नाही.

२९) साफ़सफ़ाईचे काम करतांना कार्यालयातील कोणतीही वस्तु हलवीतांना काळजीपूर्वक हालचाल करण्याच्या सूचना कामगारांना देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्याची भरपाई करावी लागल्यास मासिक देयक रकमेतून कपात करण्यात येईल.

३०) ठेकेदारास दरमहा कंत्राटाची रक्कम मागणी करण्यासाठी तीन प्रतीत देयक सादर करावे . सदर बाबत आस्थापना शाखेने प्रमाणिक केल्यानंतर देयकाचे प्रदान करन्यात येईल. कार्यालयास अनुदान प्राप्त न झाल्यास किंवा इतर शासकीय कारणाने अपवादात्मक परिस्थितीत देयक प्रदान करण्यास दोन /तीन महिने इतका कालावधी प्रलंबित राहण्याची शक्यता असल्यास अशावेळी ठेकेदाराने त्यांचे कामगारांना वेतन वेळेवर देणे बंधनकारक राहील.

३१) या कार्यालतातील इतर साफ़सफ़ाईबाबत मालमत्ता शाखेद्वारे वेळोवेळी देण्यात .येणा-या आदेशाचे पालन करावे लागेल. तसेच ठेकेदाराचे काम समाधानकारक नसल्यास ठेका/करार कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे अधिकार तसेच त्यापुढील वार्षीक दर करार मंजुर होईपर्यंत मुदतवाढ देण्यात येईल. सदर मुदतवाढीत पूर्वी ठरलेल्या दराप्रमाणे काम करावे लागेल. मुदतवाढ देणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार धर्मादाय आयुक्त , महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी राखून ठेवलेले आहेत.

३२) निविदा दाखल करणा-या संस्था किंवा कंपनी चे पॅन कार्ड व जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

३३) दरपत्रके ही जीएसटी सह देण्यात यावीत.

३४) निविदाधारकांनी मागील ३ वर्षाचे इन्कम टॅक्स रिटर्नची प्रत सोबत जोडावी.

३५) सदर निविदा प्रक्रीया कोणतेही कारण न देता थांबविणे/ रद्द करणे/पुढे ढकलने किंवा या संदर्भातील सर्व अधिकार हे सक्षम अधिका-यांकडे राखुन ठेवलेले आहेत.

निविदाकारांच्या अटी व शर्ती असलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही. तसेच या कार्यालयाच्या वर नमुद केलेल्या अटी शर्ती मान्य नसलेल्या निविदा देखील मान्य केल्या जाणार नाहीत. सदर **सफाईगार** या पदाच्या निविदा प्रक्रीयेत स्वारस्य असणा-या पुरवठादारांनी त्यांच्या निविदा सिलबंद लिफ़ाफ़्यामध्ये सदर सुचना प्रसिध्द झाले नंतर दि.**२८.०९.२०२६** रोजी दुपारी **४.००** वाजेपर्यंत आस्थापना शाखा धर्मादाय सह आयुक्त,पुणे विभाग पुणे तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,पुणे विभाग पुणे येथे जमा कराव्यात. त्या निविदा दुपारी ५.०० वाजता उघडण्यात येईल.

धर्मादाय सह आयुक्त
पुणे विभाग पुणे